# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

<u>दिनांक 16.10.2012 (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>

मंगळवार दिनांक 16.10.2012 (का.प.क्र.16) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.30 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त, श्री.एम.डी.सोनवणे, प्र.नगर सचिव श्री.रविंद्र निकम यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
02. स. श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
03. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
04. स. श्री.आगा खान मिया खान
05. स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
06. स. श्रीमती घडमोडे सविता भगवान
07. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
08. स. श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
09. स. श्री. खान अक्रम करीम खान
10. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
11. स. श्रीमती निलाबाई देविदास जगताप
12. स. श्री.समीर सुभाष राजुरकर

<u>चर्चा :</u>

श्री.रेणुकादास वैद्य :15.10.2012 रोजी गुंठेवारी कक्षाने पत्र पाठविलेले आहे. गुंठेवारी क्षेत्रातील नियमित केलेल्या रेखांकनाची माहिती कळविण्यासाठी वार्ड अभियंता यांना कळविण्यात आले आहे सदरील पत्र कशासाठी दिलेले आहे. स्थायी समितीला माहिती का? देण्यात आलेली आहे.

गुंठेवारी कक्ष प्रमुख :गुंठेवारी नियमितीकरणानंतर वार्ड कार्यालयात सर्व डाटा वार्डात असतो. कुठलीही एक संचिका मागविलेली नसुन सदरील माहिती घेणे आवश्यक आहे त्यानंतर स्थायी समिती सभेला माहिती देता आली असती. गुंठेवारी विभागातुन टेक्निकल मान्यता होती. अंतिम आदेश वार्ड अभियंता यांचेकडून काढले जातात. म्हणुन सदरील पत्र देण्यात आलेले आहे.

श्री.समीर राजुरकर :संचिका मंजूर करण्याचा अधिकार कुणाचा आहे.

गुंठेवारी कक्ष प्रमुख :संचिका गुंठेवारी कक्षातुन सहा.संचालक न.र. यांचेकडे पाठविण्यात येते. स्टोअरमध्ये सर्व संचिका ठेवल्या जात नाही.

श्री.बाळासाहेब मुंडे :सन 2010 मध्ये रक्कम भरलेली आहे. चालान भरलेले आहे. भोगवटा आणि गुंठेवारी हे दोन विभाग एकत्र असल्यामुळे गुंठेवारीकडे पुर्णतः दुर्लक्ष होत आहे.

**गुंठेवारी कक्ष प्रमुख** :प्रकरणाची माहिती दिल्यास ती तात्काळ सोडविण्यात येईल. तसेच गुंठेवारी विभागामध्ये कर्मचारी वर्ग कमी असल्यामुळे जास्त अडचणी येत आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :मोठा लेआऊट असेल तर त्यास चार दिवसात मंजूरी मिळते परंतु गुंठेवारीच्या समस्या सोडविल्या जात नाही. गुंठेवारी आणि भोगवटा प्रमाणपत्र वेगळे करण्यात यावी. गुंठेवारीचे कॅम्प लावण्यात यावे. दोन्ही गोष्टी वेगळे करण्यात यावे. भोगवटा प्रमाणपत्र नगर रचना विभागाने बघावे.

**गुंठेवारी कक्ष प्रमुख** :कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना निवडणूक व इतर भागामध्ये गुंतविले जातात त्यामुळे गुंठेवारी बाबत पुर्ण कार्यक्षमतेने वापरता येत नाही.

**श्री.समीर राजुरकर** :कमी कर्मचारी असले तरीही यातुन मार्गकाढुन काम झाले पाहिजे. जनतेसाठी आपण कार्यरत आहे. जनतेचे कामे झाली पाहिजे. कुठल्याही विभागाच्या विभाग प्रमुख यांनी स्टाफ कमी आहे असे उत्तर देण्यात येवु नये. ही विनंती.

**मा.सभापती** :गुंठेवारी आणि भोगवटा प्रमाणपत्र हे विभाग वेगळे कसे करता येईल. प्रशासनाने माहिती देण्यात यावी.

**शहर अभियंता** :दोन्ही विभागाची स्वतंत्रपध्दतीने कार्यपध्दती पाहिजे.

**मा.सभापती** :गुंठेवारी आणि भोगवटा प्रमाणपत्र हे दोन विभाग करून दोन्ही विभागांना स्वतंत्र अधिकारी नेमण्यात यावे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :पिरबाजार बाबत काहीही आदेश नव्हते असे प्रशासकीय अधिकारी यांनी वर्तमानपत्रामध्ये स्टेटमेंट दिलेले आहे.

**मा.सभापती** :युरोपियन मार्केटचे काम अद्यापपर्यंत झालेले नाही. खुलासा करण्यात यावा.

**कार्य.अभियंता (बिओटी)**:1 लाख स्के.फिट जागा आहे. वरून टेन्ट बांधुन लोकांना बसण्यासाठी जागा तयार करण्यात येत आहे. ट्रसेसचे काम चालू आहे 6 महिण्याचा वेळ देण्यात आलेला आहे. सोमवारी बाजार भरणार आहे व इतर दिवशी इतर ॲक्टीव्हिटी चालणार आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :सदरील स्टेटमेंट आदरनिय श्री.किशनचंद तनवाणी यांच्या कार्यकाळातील शेवटच्या सभेतील होते. या घटनेला आज 5 ते 6 वर्ष झाले आहे.

**कार्य.अभियंता (बिओटी)**:प्रोजेक्टवरून डेव्हलमेंट झालेले आहे. 1 लाख स्के.फुटची जागा मनपाचा हिस्सा आहे एएमसी कंम्पोनंट आहे. महानगरपालिकेला हॅन्डओवर केलेले आहे.

**श्री.समीर राजुरकर:** सर्व नियमाप्रमाणे झालेले आहे का? मनपाचे हित महत्वाचे आहे. शहरातील नागरीकांचे हित महत्वाचे आहे. नाला बरोबर आहे का? शहरातील एवढी मोठी जागा दिल्यावर मनपाला परतावा मिळाला पाहिजे.

**मा.सभापती** :वर्क ऑर्डरचा कालावधी सांगण्यात यावा.

**कार्य.अभियंता (बिओटी)**: डिसेंबरच्या शेवटपर्यंत वेळ दिलेला आहे. सभापती होण्याच्या 1 महिण्यापुर्वी वर्क ऑर्डर दिलेले आहे.

**मा.सभापती** :कामाची सुरूवात दिसुन येत नाही.

**कार्य.अभियंता (बिओटी)**:ट्रसेसचे फॅब्रिकेशनचे काम चालू आहे. यास वेळ लागणार आहे. टोटल शेड 1 लाख स्के.फिटचे आहे.

| | |
|---|---|
| प्रशासकीय अधिकारी | :स्थायी समितीने दिलेल्या निर्णयानुसार शहानुरवाडी येथील आठवडीबाजार भरला होता. मी स्वतः त्या ठिकाणी उपस्थित होतो. |
| मा.सभापती | :सभागृहात एकदा निर्णय झाल्यानंतर लेखी अपेक्षा ठेवु नये. बाजार एकदा शिफ्ट झाल्यास नागरीकांना सवय लागेल. |
| श्री.समीर राजुरकर | :शहरातील पॅथॉलॉजी लॅबबाबत माहिती मागविली होती. परंतु विभाग प्रमुख बैठकीला हजर नाही. मनपाने लॅबवर कारवाई करायला पाहिजे कारवाई का करण्यात येत नाही. विभाग प्रमुख यांनी उत्तर देणे अपेक्षीत आहे. |
| मा.सभापती | :स्थायी समितीमध्ये महत्वाच्या विषयावर चर्चा होते विभाग प्रमुख हजर नसल्यामुळे विषयाची माहिती मिळत नाही. ऑफिसर असोसिएशनच्या अध्यक्षांनी अधिकाऱ्यांमध्ये समन्वय साधायला हवा. |
| श्री.समीर राजुरकर | :स्थायी समितीला विभाग प्रमुख येणार नसेल तर बैठक कशासाठी घ्यावयाची. शहरातील महत्वाचे प्रश्न सभागृहात मांडले जातात. त्या विषयास उत्तर देण्यास अधिकारी उपस्थित नाही. |
| मा.सभापती | :स्थायी समिती सभेला प्रत्येक विभागाच्या विभाग प्रमुख यांनी हजर राहावे. |
| वैद्यकीय अधिकारी | :पॅथॉलॉजी ही मनपाच्या रजिष्ट्रेशन ॲक्टखाली येत नाही. पॅथॉलॉजी लॅबबाबत माहिती संकलन करण्याचे काम चालू आहे. |
| श्री.समीर राजूरकर | :सहा महिण्यापुर्वी आरोग्य विभागात माहिती उपलब्ध होती. पुढील स्थायी समितीला विभाग प्रमुख हजर नसल्यास सर्व स.सदस्य बहीष्कार टाकेल. |
| मा.सभापती | :पुढील स्थायी समिती सभेत आरोग्य विभागाच्या विभाग प्रमुख यांनी हजर राहावे व लॅबाबाबत सर्व माहिती देण्यात यावी. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :नवरात्र उत्सव सुरू होणार आहे. रस्त्यांमध्ये अनेक खड्डे आहे ज्या ठिकाणी उत्सव आहे त्या ठिकाणी पॅचवर्क प्राधान्याने करण्यात यावे. तसेच ज्या ठिकाणी उत्सव भरतो तसेच रस्त्यांवरील सर्व पथदिवे सुरू राहिल याची काळजी घेण्यात यावी. वार्ड ड कार्यालयात एक उपअभियंता आणि एक अभियंता आहे. काम कसे होणार. सदरील अधिकारी यांना अतिरिक्त पदभार दिलेला आहे. 17 वार्ड आहेत कामांवर नियंत्रण व इतर बाबी कशा प्रकारे करायच्या हा प्रश्न निर्माण होत असतो. |
| मा.सभापती | :वार्ड ड कार्यालयात पुरेसा अधिकारी/कर्मचारी देण्यात यावा. पाणीपुरवठयाचा चार्ज दिल्यास अधिकारी सुट्टीवर जातात. माहिती देण्यात यावी. |
| शहर अभियंता | :जो मुद्दा मांडला तो महत्वाचा आहे. पर्यायी व्यवस्था करण्यात येईल. |
| मा.सभापती | :जे अधिकारी कर्मचारी सुट्टीवर गेलेले आहेत ते माहिती काढुन प्रश्न सोडविण्यात यावा. शहरात नवरात्र उत्सव आहे त्यामुळे ज्या ठिकाणी आवश्यक आहे तसेच स.सदस्यांनी सांगीतलेले आहे त्या ठिकाणी पॅचवर्कचे काम प्राधान्याने करण्यात यावे. तसेच शहरातील सर्व रस्त्यांवरील विद्युत दिवे सुरू करण्यात यावे तसेच ज्या ठिकाणी फोकसची आवश्यकता आहे ती करण्यात यावी. |
| श्री.बाळासाहेब मुंडे | :दिपाली हॉटेल ते कर्णपुरा या रस्त्यावरील पॅचवर्कचे काम तातडीने करण्यात यावे. |
| मा.सभापती | :पॅचवर्कचे काम करण्यात यावे. |

**श्री.आगा खान मियॉ** :माझ्या वार्डातील अतिक्रमणबाबत मुद्दा सभागृहात नेहमी मांडला आहे. जालना रोड रोकडीया हनुमान कॉलनी, संत एकनाथ सोसायटी चार मोठया शो रूमचे काम सुरू आहे. याबाबत प्रशासनाकडुन बांधकाम परवानगी घेतलेली आहे का? तसेच रिवाईझ परमिशन घेतलेली आहे का? माहिती देण्यात यावी.

**उपअभियंता न.र.** : रिवाईझ परमिशन घेणे आवश्यक आहे.

**मा.सभापती** :रोड वाईंडिंग करतांना काही कामे /अतिक्रमण राहिलेली आहे प्रशासनाने प्रत्यक्षस्थळी भेट देण्यात यावी तसेच स.सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहे त्याबाबत प्रशासनाने संपुर्ण माहिती प्राप्त करण्यात यावी.

**विषय क्र. 64 :** (विषय क्र. 62 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 11/10/2012 रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

**दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.**

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती** : विषय क्रमांक 64 स्थगीत.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 65 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग अ अंतर्गत रस्त्यांचे पॅचवर्क करणेच्या कामांचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2011-12 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे. सदरील कामाच्या रक्कम रू.69,87,998/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त करून सदरील कामांकरीता ई निविदा विभागामार्फत मागविण्यात आल्या असता विहीत मुदतीत एकही निविदा अंतिम तारखेपर्यंत दर भरून प्राप्त झाली नाही. त्यामुळे पुन्हा एकदा मुदतवाढ दिली असता पुन्हा एकही निविदा दर भरून प्राप्त झाली नाही. परंतु गणेश विसर्जन दि.29 सप्टेबंर 2012 रोजी असल्याने तत्पुर्वी गणेश विसर्जन मार्गावरील रस्त्यांची दुरूस्ती करणे आवश्यक असल्याने, तसेच या कामांकरीता कालावधी अत्यल्प असल्याने तातडीची निकड लक्षात घेता व आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल्याने व दि.21/09/2012 रोजी मा.स्थायी समिती सभेने गणेश विसर्जनापुर्वी शहरातील रस्त्यावरील खड्ड्यांचे पॅचवर्क करणे बाबतच्या ज्या ठिकाणच्या कामाकरीता निविदा प्राप्त झालेल्या नाही. त्या ठिकाणच्या कामाबाबत मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात आल्यानुसार प्रभाग अ,ड,क व फ या प्रभागात निविदा प्राप्त न झाल्यामुळे हॉटमिक्स प्लांटधारक गुत्तेदारांना पाचारण करून सदर प्रभागात काम करणेस आग्रह केला असता व जाहीर निविदेद्वारे प्राप्त दरात वाटाघाटी करून 15% जास्त दर निश्चित केलेला आहे. याच दरामध्ये काम करणे बाबत संबंधीत कंत्राटदाराने संमती दर्शविल्याने सदरील काम उपलब्ध कंत्राटदार मे.मस्कट कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन 15% जास्त दरात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण 5 कलम नं.2, पोटनियम-2 अन्वये मा.स्थायी समिती सभेच्या कार्यवृत्तात कारणे नमुद करून मा.आयुक्त यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार सदरील काम करून घेणेच्या प्रस्तावास मा.आयुक्त यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

करीता सदरील काम उपलब्ध कंत्राटदार मे.मस्कट कंन्स्ट्रक्शन यांचेकडून 15% जास्त दरात वरील नमुद अधिनियमांतील तरतुदीनुसार करून घेणेच्या प्रस्तावाचा मसुदा मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.समीर राजुरकर** :गणेश विसर्जन काळात किती रूपयाचे पॅचवर्क झालेले आहे. 5(2) मध्ये 15 जास्त दराने कंत्राटदार यांना काम दिलेले आहे. त्याचे स्पेसिफिकेशन काय दिलेले आहे? डांबराचे प्रमाण, खड्डा कसा भरणार आहे, घाईघडबडीमध्ये कामाचा दर्जा कमी होता कामा नाही कामाचा दर्जा चांगला असला पाहिजे. गणेश विसर्जन काळात पॅचवर्कचे कार्योत्तर कामे किती केलेली आहेत.

**शहर अभियंता** :सहा वार्डमध्ये पॅचवर्क काढण्याच्या निवीदा काढण्यात आल्या होत्या. सहा निवीदापैकी दोन निवीदा भरण्यात गेल्यात त्याच्यामध्ये 29 आणि 22 टक्के above आले होते व चार निवीदा प्राप्त झाल्या नाही. आजच्या

भाववाढच्या नुसार त्याचे वर्गीकरण केले गेले. 15 टक्यांनी दोन निवीदा प्रशासनाने स्विकारल्या होत्या. उर्वरित ज्या निवीदा आल्या नाहीत त्यात स्थायी समितीच्या निर्णयानुसार मा.आयुक्तांना अधिकार प्रदान करून 5 (2)2 नुसार प्रस्तावित केले. प्रभाग सहा मध्ये 20 ते 25 लाखाचे काम झ ालेले आहे. सदरील निवीदा हया वर्षभर पॅचवर्कचे काम करता येईल अशा आहेत. साधारणपणे मे पर्यंत काम करता येईल.

श्री.बाळुलाल गुजर :डांबरचे भाव कमी होत आहे.

मा.सभापती :वर्षभर पॅचवर्कचे काम झाले पाहिजे. कुठेही खोदकाम झाले किंवा रस्त्यांवर खड्डे पडल्यास पॅचवर्कचे कामे झाले पाहिजे.

श्री.समीर राजुरकर :ज्या ठिकाणी पॅचवर्कची आवश्यकता आहे त्या ठिकाणी पॅचवर्कचे कामे झ ाली पाहिजे. साईड बघीतल्याशिवाय पॅचवर्कचे काम करण्यत येवु नये.

शहर अभियंता : पॅचवर्क आवश्यक असेल त्या ठिकाणी करण्यात येईल.

मा.सभापती : विषय क्रमांक 65 मंजूर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग अ अंतर्गत रस्त्यांचे पॅचवर्क करणेच्या कामासाठी निविदा प्राप्त न झाल्यामुळे हॉटमिक्स प्लांटधारक गुत्तेदारांना पाचारण करून जाहीर निविदेद्वारे प्राप्त दरात वाटाघाटी करून 15% जास्त दर निश्चित केल्यानुसार याच दरामध्ये काम करणे बाबत संबंधीत कंत्राटदाराने संमती दर्शविल्याने सदरील काम उपलब्ध कंत्राटदार मे.मस्कट कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन 15% जास्त दरात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण 5 कलम नं.2, पोटनियम-2 अन्वये करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 66 :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग ब अंतर्गत रस्त्यांचे पॅचवर्क करणेच्या कामांचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2011-12 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे. सदरील कामाच्या रक्कम रू.42,01,437/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त करून सदरील कामांकरीता ई निविदा विभागामार्फत मागविण्यात आल्या असता विहीत मुदतीत एकही निविदा अंतिम तारखेपर्यंत दर भरून प्राप्त झाली नाही. त्यामुळे पुन्हा एकदा मुदतवाढ दिली असता मे.आर.के.कंन्स्ट्रक्शन यांची निविदा 28.95% जास्त दराची खालील अटी शर्तीसह प्राप्त झाली.

1. काम सुरू करण्यापूर्वी मागील थकीत देयके मिळावी.
2. दर महिन्याला देयक मिळावे.
3. डांबर खरेदी करण्याकरीता 30.00% अगामी रक्कम देण्यात यावी.

गुत्तेदारास समक्ष वाटाघाटीस बोलावुन विना अट काम करणे बाबत सुचविले असता गुत्तेदाराने अटी शिथील केल्या व आज बाजार भावानुसार डांबर, डिझेल, लेबर दर भाव वाढ लक्षात घेता 28.95% जास्त ऐवजी 15.% जास्त दराने करण्यास संमती दर्शविली.

करीता सदरील काम उपलब्ध कंत्राटदार मे.आर.के.कंन्स्ट्रक्शन यांचेकडून 15.00% जास्त दरात करून घेणेच्या प्रस्तावाचा मसुदा मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 66 ते 70 मंजूर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग ब अंतर्गत रस्त्यांचे पॅचवर्क करणेच्या अंदाजपत्रकीय रक्कम रू.42,01,437/- च्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदेनुसार निविदाधारक मे.आर.के.कंन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार विना अट सदर

**काम मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प.दरापेक्षा 15.00% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

विषय क्र. 67 :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क अंतर्गत रस्त्यांचे पॅचवर्क करणेच्या कामांचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2011-12 च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाच्या रक्कम रू.49,97,116/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त करून सदरील कामांकरीता ई निविदा विभागामार्फत मागविण्यात आल्या असता विहीत मुदतीत एकही निविदा अंतिम तारखेपर्यंत दर भरून प्राप्त झाली नाही. त्यामुळे पुन्हा एकदा मुदतवाढ दिली असता पुन्हा एकही निविदा दर भरून प्राप्त झाली नाही. परंतु गणेश विसर्जन दि.29 सप्टेबंर 2012 रोजी असल्याने तत्पुर्वी गणेश विसर्जन मार्गावरील रस्त्यांची दुरूस्ती करणे आवश्यक असल्याने, तसेच या कामांकरीता कालावधी अत्यल्प असल्याने तातडीची निकड लक्षात घेता व आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल्याने व दि.21/09/2012 रोजी मा.स्थायी समिती सभेने गणेश विसर्जनापुर्वी शहरातील रस्त्यावरील खड्ड्यांचे पॅचवर्क करणे बाबतच्या ज्या ठिकाणच्या कामाकरीता निविदा प्राप्त झालेल्या नाही. त्या ठिकाणच्या कामाबाबत मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात आल्यानुसार प्रभाग अ,ड,क व फ या प्रभागात निविदा प्राप्त न झाल्यामुळे हॉटमिक्स प्लांटधारक गुत्तेदारांना पाचारण करून सदर प्रभागात काम करणेस आग्रह केला असता व जाहीर निविदेद्वारे प्राप्त दरात वाटाघाटी करून 15% जास्त दर निश्चित केलेला आहे. याच दरामध्ये काम करणे बाबत संबंधीत कंत्राटदाराने संमती दर्शविल्याने सदरील काम उपलब्ध कंत्राटदार मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन 15% जास्त दरात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण 5 कलम नं.2, पोटनियम-2 अन्वये मा.स्थायी समिती सभेच्या कार्यवृत्तात कारणे नमुद करून मा.आयुक्त यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार सदरील काम करून घेणेच्या प्रस्तावास मा.आयुक्त यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

करीता सदरील काम उपलब्ध कंत्राटदार मे.आदीनाथ कंन्स्ट्रक्शन यांचेकडून 15% जास्त दरात वरील नमुद अधिनियमांतील तरतुदीनुसार करून घेणेच्या प्रस्तावाचा मसुदा मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क अंतर्गत रस्त्यांचे पॅचवर्क करणेच्या अंदाजपत्रकीय रक्कम रू.49,97,116/- चे कामासाठी दोन वेळेस विहीत मुदतीत एकही निविदा प्राप्त न झाल्यामुळे आणि गणेश विसर्जन मार्गावरील रस्त्यांची दुरूस्ती करणे आवश्यक असल्याने, तसेच या कामांकरीता कालावधी अत्यल्प असल्याने तातडीची निकड लक्षात घेता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण 5 कलम नं.2, पोटनियम-2 अन्वये सदर काम उपलब्ध कंत्राटदार मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन 15% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 68 :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग ड अंतर्गत रस्त्यांचे पॅचवर्क करणेच्या कामांचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2011-12 च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाच्या रक्कम रू.49,93,507/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त करून सदरील कामांकरीता ई निविदा विभागामार्फत मागविण्यात आल्या असता विहीत मुदतीत एकही निविदा अंतिम तारखेपर्यंत दर भरून प्राप्त झाली नाही. त्यामुळे पुन्हा एकदा मुदतवाढ दिली असता पुन्हा एकही निविदा दर भरून प्राप्त झाली नाही. परंतु गणेश विसर्जन दि.29 सप्टेबंर 2012 रोजी असल्याने तत्पुर्वी गणेश विसर्जन मार्गावरील रस्त्यांची दुरूस्ती करणे आवश्यक असल्याने, तसेच या कामांकरीता कालावधी अत्यल्प असल्याने तातडीची निकड लक्षात घेता व आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल्याने व दि.21/09/2012

रोजी मा.स्थायी समिती सभेने गणेश विसर्जनापुर्वी शहरातील रस्त्यावरील खड्ड्यांचे पॅचवर्क करणे बाबतच्या ज्या ठिकाणच्या कामाकरीता निविदा प्राप्त झालेल्या नाही. त्या ठिकाणच्या कामाबाबत मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात आल्यानुसार प्रभाग अ,ड,क व फ या प्रभागात निविदा प्राप्त न झाल्यामुळे हॉटमिक्स प्लांटधारक गुत्तेदारांना पाचारण करून सदर प्रभागात काम करणेस आग्रह केला असता व जाहीर निविदेद्वारे प्राप्त दरात वाटाघाटी करून 15% जास्त दर निश्चित केलेला आहे. याच दरामध्ये काम करणे बाबत संबंधीत कंत्राटदाराने संमती दर्शविल्याने सदरील काम उपलब्ध कंत्राटदार श्री.के.बी.पाथ्रीकर यांचेकडुन 15% जास्त दरात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण 5 कलम नं.2, पोटनियम-2 अन्वये मा.स्थायी समिती सभेच्या कार्यवृत्तात कारणे नमुद करून मा.आयुक्त यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार सदरील काम करून घेणेच्या प्रस्तावास मा.आयुक्त यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

करीता सदरील काम उपलब्ध कंत्राटदार श्री.के.बी.पाथ्रीकर यांचेकडून 15% जास्त दरात वरील नमुद अधिनियमांतील तरतुदीनुसार करून घेणेच्या प्रस्तावाचा मसुदा मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग ड अंतर्गत रस्त्यांचे पॅचवर्क करणेच्या अंदाजपत्रकीय रक्कम रू.49,93,507/- चे कामासाठी दोन वेळेस विहीत मुदतीत एकही निविदा प्राप्त न झाल्यामुळे आणि गणेश विसर्जन मार्गावरील रस्त्यांची दुरूस्ती करणे आवश्यक असल्याने, तसेच या कामांकरीता कालावधी अत्यल्प असल्याने तातडीची निकड लक्षात घेता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण 5 कलम नं.2, पोटनियम-2 अन्वये सदर काम उपलब्ध कंत्राटदार श्री.के.बी.पाथ्रीकर यांचेकडुन 15% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>विषय क्र. 69 :</u>

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग ई अंतर्गत रस्त्यांचे पॅचवर्क करणेच्या कामांचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2011-12 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे. सदरील कामाच्या रक्कम रू.29,78,740/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त करून सदरील कामांकरीता ई निविदा विभागामार्फत मागविण्यात आल्या असता विहीत मुदतीत एकही निविदा अंतिम तारखेपर्यंत दर भरून प्राप्त झाली नाही. त्यामुळे पुन्हा एकदा मुदतवाढ दिली असता मे.आर.के.कंन्स्ट्रक्शन यांची निविदा 15.99% जास्त दराची खालील अटी शर्तीसह प्राप्त झाली.

1. काम सुरू करण्यापूर्वी मागील थकीत देयके मिळावी.
2. दर महिन्याला देयक मिळावे.
3. डांबर खरेदी करण्याकरीता 30.00% अगामी रक्कम देण्यात यावी.

गुत्तेदारास समक्ष वाटाघाटीस बोलावुन विना अट काम करणे बाबत सुचविले असता गुत्तेदाराने अटी शिथील केल्या व आज बाजार भावानुसार डांबर, डिझेल, लेबर दर भाव वाढ लक्षात घेता 15.99% जास्त ऐवजी 15.% जास्त दराने करण्यास संमती दर्शविली.

करीता सदरील काम उपलब्ध कंत्राटदार मे.आर.के.कंन्स्ट्रक्शन यांचेकडून 15.00% जास्त दरात करून घेणेच्या प्रस्तावाचा मसुदा मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग ई अंतर्गत रस्त्यांचे पॅचवर्क करणेच्या अंदाजपत्रकीय रक्कम रू.29,78,740/- च्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदेनुसार निविदाधारक मे.आर.के.कंन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार विना अट सदर

**काम उपलब्ध कंत्राटदार मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प.दरापेक्षा 15.00% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**विषय क्र. 70 :**

**प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग फ अंतर्गत रस्त्यांचे पॅचवर्क करणेच्या कामांचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2011-12 च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाच्या रक्कम रू.29,68,639/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त करून सदरील कामांकरीता ई निविदा विभागामार्फत मागविण्यात आल्या असता विहीत मुदतीत एकही निविदा अंतिम तारखेपर्यंत दर भरून प्राप्त झाली नाही. त्यामुळे पुन्हा एकदा मुदतवाढ दिली असता पुन्हा एकही निविदा दर भरून प्राप्त झाली नाही. परंतु गणेश विसर्जन दि.29 सप्टेंबर 2012 रोजी असल्याने तत्पुर्वी गणेश विसर्जन मार्गावरील रस्त्यांची दुरूस्ती करणे आवश्यक असल्याने, तसेच या कामांकरीता कालावधी अत्यल्प असल्याने तातडीची निकड लक्षात घेता व आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल्याने व दि.21/09/2012 रोजी मा.स्थायी समिती सभेने गणेश विसर्जनापुर्वी शहरातील रस्त्यावरील खड्ड्यांचे पॅचवर्क करणे बाबतच्या ज्या ठिकाणच्या कामाकरीता निविदा प्राप्त झालेल्या नाही. त्या ठिकाणच्या कामाबाबत मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात आल्यानुसार प्रभाग अ,ड,क व फ या प्रभागात निविदा प्राप्त न झाल्यामुळे हॉटमिक्स प्लांटधारक गुत्तेदारांना पाचारण करून सदर प्रभागात काम करणेस आग्रह केला असता व जाहीर निविदेद्वारे प्राप्त दरात वाटाघाटी करून 15% जास्त दर निश्चित केलेला आहे. याच दरामध्ये काम करणे बाबत संबंधीत कंत्राटदाराने संमती दर्शविल्याने सदरील काम उपलब्ध कंत्राटदार श्री.एम.ए.सिध्दीकी यांचेकडुन 15% जास्त दरात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण 5 कलम नं.2, पोटनियम-2 अन्वये मा.स्थायी समिती सभेच्या कार्यवृत्तात कारणे नमुद करून मा.आयुक्त यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार सदरील काम करून घेणेच्या प्रस्तावास मा.आयुक्त यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.**

**करीता सदरील काम उपलब्ध कंत्राटदार श्री.एम.ए.सिध्दीकी यांचेकडून 15% जास्त दरात वरील नमुद अधिनियमांतील तरतुदीनुसार करून घेणेच्या प्रस्तावाचा मसुदा मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग फ अंतर्गत रस्त्यांचे पॅचवर्क करणेच्या अंदाजपत्रकीय रक्कम रू.29,68,639/- चे कामासाठी दोन वेळेस विहीत मुदतीत एकही निविदा प्राप्त न झाल्यामुळे आणि गणेश विसर्जन मार्गावरील रस्त्यांची दुरूस्ती करणे आवश्यक असल्याने, तसेच या कामांकरीता कालावधी अत्यल्प असल्याने तातडीची निकड लक्षात घेता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण 5 कलम नं.2, पोटनियम-2 अन्वये सदर काम उपलब्ध कंत्राटदार श्री.एम.ए.सिध्दीकी यांचेकडुन 15% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**विषय क्र. 71 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शहर विकास आराखड्यातंर्गत शहरातील रस्त्यामध्ये उभे असलेले जीटीएल कंपनीचे विद्युत खांब व डी.पी. स्थलांतरीत करण्याचे काम जीटीएल कंपनीतर्फे सुरू करण्यात आलेले होते. सदरचे काम संथ गतीने होत असल्यामुळे नागरीकांचा रोष वाढत असून शहरामध्ये वाहतुकीस विजेच्या खांबाचा अडथळा होत आहे. जीटीएल कंपनीस काम तातडीने करणे बाबत वारंवार सूचना देवूनही कामात प्रगती दिसून येत नसल्याने दिनांक 31/08/2012 रोजी जिल्हास्तरीय विद्युतीकरण प्रभावीपणे राबविणेच्या अनुषंगाने मा.खासदार श्री.चंद्रकांतजी खैरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये मा.आमदार श्री.प्रदीप जैस्वाल, मा.सभापती श्री.विकास जैन, मा.आयुक्त महोदय मनपा,

स.स.श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.जगदीश सिध्द, श्री.प्रफुल्ल मालाणी, श्री.अनिल जैस्वाल, महावितरण कंपनीचे मुख्य अभियंता श्री.शिंदे तसेच जीटीएल कंपनीचे अध्यक्ष श्री.जगदीश चेलारमाणी, मा.शहर अभियंता श्री.एम.डी.सोनवणे, कार्यकारी अभियंता श्री.एस.डी.पानझडे, कार्यकारी अभियंता श्री.सय्यद सिंकदर अली, उपअभियंता विद्युत यांच्या उपस्थितीत बैठक झाली. सदर बैठकीमध्ये गणेश उत्सवापूर्वी विद्युत खांब तात्काळ काढणे बाबत जीटीएल कंपनीस सूचविले परंतु गणेश उत्सावाचा कालावधी पाहता जीटीएल कंपनीने हे काम गणेश उत्सवापूर्वी करणे शक्य नसल्याचे सांगितले. गणेश उत्सावापुर्वी विद्युत खांब हटविले जात नसल्याने नागरीकांनी शहागंज ते सिटीचौक या रोडवरील खांब काढण्यास सुरूवात केली, खांबाचे खोदकाम सुरू केले, आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, म्हणुन सर्वसंमतीने झालेल्या निर्णयाप्रमाणे राहीलेला कालावधी लक्षात घेता सदर काम महानगरपालिकेतर्फे 1.3 % निरीक्षण शुल्काचा जीटीएल कंपनीस भरणा करून काम करण्याचे ठरले. तसेच इतर रोडवरील खांब व डी.पी. स्थलांतरीत करण्याचे काम जीटीएल कंपनीतर्फे जे ठेकेदार करीत आहे, ते मे.श्री.समर्थ ईलेक्ट्रीकल अँड इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद यांना जीटीएल कंपनीच्या प्राप्त कोटेशनच्या मान्य दरानुसार विनानिविदा काम देण्याचे ठरले. त्यास मा.आयुक्तांनी मान्यता दिली आहे. तसेच जीटीएल कंपनीतर्फे विद्युत खांब व डी.पी. स्थलांतरीत करण्यासाठी खालीलप्रमाणे कोटेशन प्राप्त झाले आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | जीटीएलचे प्राप्त कोटेशन रूपये | अंदाजपत्रकात 10% अपेक्षीत वाढ | लेबर सर्व्हीस टॅक्स 12.36%, व्हॅट 5% व ट्रान्सपोर्ट टॅक्स | एकुण रक्कम (रकाना 3+4+5 ची एकुण बेरीज रूपये.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | शहागंज ते सिटीचौक रस्त्यावरील विद्युत पोल व डि.पी.स्लांतरीत करणे | 37,00,000/- | 3,70,000/- | 2,74,262/- | 43,44,262/- |
| 2 | सिटीचौक ते गुलमंडी रस्त्यावरील विद्युत पोल व डि.पी. स्थलांतरीत करणे | 35,00,000/- | 3,50,000/- | 2,58,399/- | 41,08,399/- |
| 3 | पथदिव्यांसाठी पोलसह केबल टाकणे. | 11,00,000/- | --- | --- | 11,00,000/- |
| | | | | एकुण रू. | 95,52,661/- |

जीटीएल कंपनीकडुन रू.72,00,000/- लक्षचे कोटेशन प्राप्त झालेले आहे. त्यामध्ये प्राप्त अंदाजपत्रकात 10% अपेक्षित वाढ व लेबर चार्जेस, व्हॅट, ट्रान्सपोर्ट चार्जेस असा एकूण 17.36% अति.टॅक्स रू.12,52,661/- व पथदिव्यांसाठी पोल, केबल टाकणेसाठी लागणारी रक्कम रू.11,00,000/- असा एकूण रक्कम रू.95,52,661/- चा खर्च येणार आहे. तसेच सदर कामाचे 1.3% निरीक्षण शुल्क जीटीएल कंपनीस रू.93,600/- चा भरणा करावयाचा आहे. तसेच हे काम करण्यासाठी जीटीएल कंपनीचे काम करणारे ठेकेदार मे.श्री.समर्थ ईलेक्ट्रीकल अँड इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद (श्री.एन.बी.कुलकर्णी) यांना विनानिविदा जीटीएलच्या प्राप्त कोटेशनच्या मान्य दरानुसार (महावितरणच्या मान्यतेनुसार) काम करण्यास मान्यता देण्यास्तव तसेच रू.95,52,661/- च्या खर्चास मान्यता व अग्रीम म्हणुन रू.50.00 लक्ष चा धनादेश ठेकेदारास देणेस्तव प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 71 मध्ये 17 टक्के टॅक्स लावलेला आहे. चुकीने 17 टक्के झालेले आहे त्यात 10 टक्के अशी आहे.

मा.सभापती : विषय क्रमांक 72

**श्री.आगा खान** :गांधी पुतळा ते सिटी चौक या मार्गातील पोल काढण्यासाठी 33 लाख रूपये खर्च आहे. किती पोल काढावयाचे आहे.

**मा.सभापती** :गणपती उत्सवामुळे तातडीने काम करून घेण्यात आले होते. जीटीएलने सांगीतले होते की, 1.3 टक्के घेणार नाही. खुलासा करण्यात यावा.

**कार्य.अभियंता (विद्युत)** :श्री.जगदिश चेरामणी यांनी सांगीतले होते की 1.3 टक्के घेणार नाही. त्यानंतर श्री.चेरामणी यांनी त्यांचे डायरेक्टरशी विचारविनीमय झाल्यावर त्यावर सुपरव्हिजन (पर्यवेक्षण) चार्ज द्यावा लागेल असे सांगीतले.

**मा.सभापती** :मा.खासदार,आमदार सर्व पदाधिकारी यांचेसमोर 1.3 टक्के घेणार नाही म्हणुन सांगण्यात आले होते.

**श्री.गिरजाराम हाळनोर** :त्या बैठकीतील इतिवृत्त मागविण्यात यावे त्यात 1.3 टक्के कमी करण्याबाबत निर्णय झालेला आहे.

**श्री.समीर राजुरकर** :सर्व स. मा.खासदार,आमदार सर्व पदाधिकारी असतांना निर्णय झालेला आहे मग हा विषय स्थायी समितीसमोर आला कसा?

**कार्य.अभियंता (विद्युत)** :श्री.चेरामणी यांना तसे अधिकार नाही म्हणुन मनपाला कळविलेले आहे. त्यामुळे विषय स्थायी समितीसमोर आला आहे.

**श्री.समीर राजुरकर** :एकदा निर्णय झाल्यावर सर्व स.मा.खासदार, आमदार यांना पत्राद्वारे कळविण्यात आले पाहिजे होते की, 1.3 टक्के कमी करण्यास जीटीएल तयार नाही. हा विषय स्थायी समितीसमोर आणायला नको होता.

**कार्य.अभियंता (विद्युत)** :भावनात्मक झाल्यामुळे त्यांनी तसा निर्णय घेतला होता.

**श्री.गिरजाराम हाळनोर** :जीटीएल कर भरण्यास तयार नाही.

**श्री.समीर राजुरकर** :शहरात जीटीएलच्या जेवढया डिपी आहेत. त्याचे मोजमाप करण्यात यावे. सगळया डिपींना मालमत्ता विभागातर्फे टॅक्स लावण्यास सुरवात करण्यात यावी. 1.3 टक्के कमी करत नसेल तर मनपाने हयगय करून नये. शहरातील असलेले सर्व पोल यांना एलबीटी आकरण्यात यावी. महानगरपालिका जीटीएलला सहकार्य करीत होती परंतु नागरीकांशी संबधीत असलेल्या संस्थेविषयी अशा पध्दतीची वागणुक देत असेल तर त्यांचेबाबतीत काहीही भावनिकता बाळगता कामा नये. सर्व पोल व डिपी यांना टॅक्स लावुन मनपातर्फे जीटीएलला नोटीस देण्यात यावी. जमीनीचे भाडे लावण्यात यावे. हेतुपुरस्करपणे पैसे काढण्याच्या दृष्टीने करत असेल तर त्यांचे विषयी काहीही प्रेम बाळगण्याचे कारण नाही. नियमामध्ये ॲक्टमध्ये बसुन नोटीस देण्यात यावी.

**मा.सभापती** : अतिशय महत्वाचा मुद्दा आहे. 1.3 टक्के यामधुन वगळले पाहिजे. 1.3टक्के कमी करण्याच्या बैठकीचे इतिवृत्त जीटीएलला देण्यात यावे. स.सदस्यांनी ज्या प्रमाणे सांगीतले आहे त्याप्रमाणे शहरात असणारे पोल व डिपींना टॅक्स लावण्यात यावे. डिपीची जागा मोजण्यात यावे. पत्र देण्यात यावे.

**श्री.नारायण कुचे** :जीटीएल कंपनी जेव्हापासून सुरू झालेली आहे तेव्हापासून भाडे /टॅक्स लावण्यात यावे.

**श्री.समीर राजुरकर** :प्रशासनाने अतिशय गंभिरतेने व मुंबई प्रांतिक महानगरपालिकेच्या कलमांनुसार पत्र देण्यात यावे.

**मा.सभापती** :मागील बैठकीत जीटीएलला पत्र दिलेले आहे कारवाई काय केली. खुलासा करण्यात यावा.

मुख्यलेखाधिकारी :सुचनेनुसार पत्र दिलेले आहे. बिओटी विभागाने उत्तर प्राप्त झालेले आहे. 16 तारखेला डिमांड दिलेली आहे. 6 कोटी 17 लाखाची डिमांड दिलेली आहे. सदर कंपनीने रिटपिटीशन (क्रमांक 7686/2012) दाखल केलेला आहे. दिनांक 12.09.2012 चे आदेश पारित करून कंपनी व मनपा यांची संयुक्त सुनावणी दिनांक 24.09.2012 रोजी घेवुन निर्णय घेण्याचे आदेश पारित केलेले आहे. त्यानुसार सुनावणी घेण्यात आलेली आहे.

मा.सभापती :मनपाचा अधिकार आहे. सहा कोटीचे कॅलक्युलेशन कशापध्दतीने केलेले आहे.

एलबीटी अधिकारी :दिनांक 01.04.2012 पासून 2 टक्के एलबीटी लावण्याचे शासनाने मंजूरी दिलेली आहे. त्यानुषंगाने जीटीएलला पत्र दिले होते. त्यांनी त्यास प्रतिसाद न दिल्यामुळे महावितरण कंपनीला पत्रव्यवहार करून त्यांचेकडुन माहे एप्रिल ते ऑगष्ट पर्यंत विजदेयक किती पारित केलेले आहे. याची माहिती घेतली याच्याअनुषंगाने 293 कोटी 73 लाख रूपयांची वीज घेतलेली आहे असे कळविलेले आहे. मनपाने या रकमेवर 7 दिवसांच्या आत 2 टक्के रकमेसह एलबीटीचा भरणा करावा परंतु भरणा न केल्यामुळे ऑर्डर पारित केले. 6 कोटी 17 लाख 12 हजार चे एलबीटी भरणा करण्याचे आदेश देण्यात आले यानुषंगाने मा.न्यायालयात त्यांनी धाव घेतली. मा.उच्च न्यायालयाने सुनावणी घेवुन जी रक्कम दिलेली आहे ती व्यवस्थित ठरवुन घ्यावी की ही महापालिकेच्या हद्दीतली आहे की कशी त्यापध्दतीने सुनावणी घेतली होती त्यानुसार त्यांनी मुदत मागीतली होती त्यानुसार दिनांक 22.10.2012पर्यंत मुदत मागीतलेली आहे. त्यानंतर पुन्हा सुनावणी घेण्यात येवुन रक्कम अंतिम करून आदेश पारित करावयाचे आहे. 293 कोटी 73 लाख रूपयांची वीज घेतलेली आहे असे महावितरण कंपनीने कळविलेले आहे.

मा.सभापती :प्रशासनाने काळजी घेण्यात यावी. जीटीएलचे रेग्युलर वीज घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे त्याचे कॅलक्युलेशन कसे करणार आहे.

श्री.समीर राजुरकर :प्रत्येक महिण्यात 2 ते 3 टक्के वीज घेणाऱ्यांच्या संखेत वाढ होणार आहे. सुनावणी झाल्यानंतर आदेश पारित होईल तेव्हा आदेशात नमुद करण्यात यावे की, दर महिण्याला जे काही कनेक्शन वाढतील त्याचे इनपुट मनपाकडे आले पाहिजे व त्यावर तेवढा टॅक्स वाढविण्यात यावा.

मा.सभापती :दर महिण्याचा इनपुट रिपोर्ट आला पाहिजे. करारामध्ये स्पष्ट तसे नमुद करण्यात यावे.

श्री.आगा खान मियॉ :गांधीपुतळा ते सिटीचौक किती पोल काढले आहे

कार्य.अभियंता (विद्युत) :13 पोल काढण्यात आलेले आहे. सिटीचौक ते गुलमंडी येथील पोल काढण्याचे काम सुरू झालेले नाही यामध्ये 16 पोल आहे.

श्री.आगा खान मियॉ :36 लाख रूपये बरोबर आहे का?

मा.सभापती :इस्टिमेटबाबत माहिती देण्यात यावी.

कार्य.अभियंता (विद्युत) :जीटीएल मार्फत सर्वे करण्यात येत आहे. पोल काढणे, केबल टाकणे कन्झुमर, फिडर लाईन या सर्व बाबी आहे.

मा.सभापती :सदरील काम पुर्वी जीटीएल मार्फत करावयाचे होते आता महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

कार्य.अभियंता (विद्युत) :जीटीएलने असमर्थता दाखविली होती, सदरील काम महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

श्री.समीर राजुरकर :एक पोलला साधारणतः किती खर्च लागणार आहे याच्या तपशिलासह पुढील सभेत नमुद करण्यात यावे.

मा.सभापती : सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे दुरूस्तीसह प्रस्तावास मंजुरी देण्यांत येते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहर विकास आराखड्यातंर्गत शहरातील रस्त्यामध्ये उभे असलेले जीटीएल कंपनीचे विद्युत खांब व डी.पी. स्थलांतरीत करण्याचे काम तसेच इतर रोडवरील खांब व डी.पी. स्थलांतरीत करण्याचे काम जीटीएल कंपनीतर्फे जे ठेकेदार करीत आहे, ते मे.श्री.समर्थ ईलेक्ट्रीकल अँड इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद यांचेमार्फत जीटीएल कंपनीच्या प्राप्त कोटेशनच्या मान्य दरानुसार विनानिविदा करून घेण्यास तसेच रू.95,52,661/- च्या खर्चास मान्यता व अग्रीम म्हणुन रू.50.00 लक्ष चा धनादेश ठेकेदारास देणेस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे, जीटीएल कंपनीस द्यावयाचे 1.3% निरीक्षण शुल्क कमी करण्यांत यावे, ठेकेदाराचे विनंतीनुसार 2% एल.बी.टी. करामध्ये सुट देण्यांत यावी व रेल्वेस्टेशन ते क्रांतीचौक या रस्त्यामध्ये बाधीत विद्युत खांब व डी.पी. स्थलांतरीत करण्याचे काम मे.श्री.समर्थ ईलेक्ट्रीकल अँड इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद यांचेमार्फत तात्काळ सुरू करावे व या कामासाठी येणाऱ्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

विषय क्र. 72 :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेचे औरंगपुरा येथील (1) व्यापारी संकुलाचे (Super Market) पश्चिमेकडील उपलब्ध जागेपैकी 398.00 चौ.मी. आणि (2) औरंगपुरा-निराला बाजार मुख्य रस्त्यावरील सुलभ शौचालय इमारतीचे मागे 884.00 चौ.मी. याप्रमाणे एकत्रित 1282.00 चौ.मी. क्षेत्रावर बी.ओ.टी. तत्वावर वाहनतळ विकसीत करण्याची संकल्पना आहे. सदर क्षेत्रातुन वाहणाऱ्या नाल्याचे प्रवाह अबाधित ठेवुन वाहनतळ क्षेत्र विकसीत करणे बंधनकारक ठेवण्याचा मानस आहे. सदर प्रकल्पासाठी क्षेत्र वापराबाबत अनुज्ञेयते संबंधी (Land Use Specification) व अनुषंगिक अहवालास अधिन राहुन सर्व संबंधित विभागांची संमंती घेऊन सदर प्रकल्प विकासाची संकल्पना आहे. करिता उक्त प्रस्तावित केल्यानुसार एकंदर 1282.00 चौ.मी. जागेवर तीस (30) वर्षाच्या भाडेपट्टा तत्वावर वाहनतळ विकसीत करण्याचा प्रस्तावास बीओटी समितीने सदर प्रकल्पावर विशेष परवानगी व तरतुदी आधारे मिळणारे वाणिज्य व्यापारासाठी शासनाकडे पाठपुरावा करुन प्रकल्प राबविण्यास दिनांक 31.05.2011 रोजी मान्यता प्रदान केलेली आहे. सदर जागा नाल्यावर असल्याने प्रकल्प विकसीत करण्यासाठी शासनाची मान्यता आवश्यक असुन संबंधित निविदेतील अटी व शर्तीनुसार संबंधित निविदा धारक यांनी शासनाची मंजुरी प्राप्त करवुन घेतल्यानंतरच करारनामा/कामाचा कार्यादेश निर्गमीत करण्यात येईल.

त्या अनुषंगाने औरंगपुरा साईट न. 56 येथे व्यापारी संकुल व वाहनतळ 30 वर्षाच्या भाडेपट्टा कालावधीसाठी बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करणेस जा.क्र./मनपा/ई-निविदा/2012/27, दिनांक 09.05.2012 नुसार वर्तमान पत्रात प्रसिध्द करुन निविदा प्रकाशीत करण्यात आल्या होत्या.

निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक 13.06.2012 रोजी पावेतो एकूण दोन निविदा दाखल झाल्या असता, त्यांची तांत्रिक पात्रता उघडण्यात आली असता, पात्र झालेल्या निविदा धारकांनी दाखल केलेले नापरतावा रकमेचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ. क्र. | निविदा धारकाचे नांव | नापरतावा रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1 | मे.पाटील कन्स्ट्रक्शन ॲन्ड इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | 51,00,000/- |

| | | |
|---|---|---|
| | तिसरा मजला, पीएमपीएमएल बिल्डींग न.01, आयकर कार्यालयाच्या समोर, शंकरसेठ रोड, स्वारगेट पुणे. | |
| 2 | मे.पी.पी. खारपाटील कन्स्ट्रक्शन प्रा.लि., चिरनार, ता.उरण, जिल्हा रायगड | 39,00,000/- |

निविदेतील सर्व अटी व शर्तीसह सदर देकार दर प्रिमियम रुपये 51,00,000/- मनपासाठी लाभदायक असुन सदर देकार दरास मा. आयुक्त यांनी मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच भाडेपट्टा दर रुपये 50/- चौ.मी. प्रतिमाह मिळणार असुन भाडेपट्टा दरात दर तीन वर्षाने 12% वाढ होणार आहे व 30 वर्षानंतर संपुर्ण प्रकल्प महानगरपालिकेस हस्तांतरीत होणार आहे.

तरी मे. पाटील कन्स्ट्रक्शन ॲन्ड इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांचे देकार दर रु.51,00,000/- हे महानगरपालिकेस लाभदायक असल्याने मे. पाटील कन्स्ट्रक्शन ॲन्ड इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांची सदर बी.ओ.टी. प्रकल्पासाठीचे निविदा दर व 30 वर्षाच्या भाडेपट्टयाच्या करारावर प्रकल्प विकसित करण्यासाठी निविदा दरास मंजुरी प्राप्त होवुन पुढील मंजुरीस्तव मा. सर्व साधारण सभागृहाच्या मंजुरीस्तव सादर करणेसाठी विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

<u>संवाद :</u>

श्री.समीर राजुरकर :विषयाबाबत माहिती देण्यात यावी.

कार्य.अभियंता (विद्युत) :जनता बाजार औरंगपुरा, सुपर मार्केटच्या बाजुला डिपी रिझर्वेशन आहे. पार्कीगसाठी 398 स्के.मी. जागा आहे. शॉपिंग कॉम्पलेक्स आणि पार्कींगसाठी 884 स्के.मी. जागा आहे. नाथ सुपर मार्केटच्या पश्चिम बाजुला. जागेचा विकास करण्यासाठी टेंडर कॉल करण्यात आले होते. तसेच रूपये 50 प्रति स्के.मी.प्रति महिना लिजरेन्ट लावण्यात आलेले आहे. 3 वर्षानंतर 12 टक्के वाढ होणार आहे.

श्री.समीर राजुरकर :1282 स्के.मी. यामध्ये एएमसी कंम्पोनंट आहेत का?

कार्य.अभियंता (बिओटी):यामध्ये एएमसी कंम्पोनंट नाही. तेथे जी पार्कीग आहे त्यास आहे. सदरील जागा नाल्यावरील आहे. जागा डिपी रिझवेशनमध्ये उल्लेख केलेला आहे की, पार्कीगसाठी 398 स्के.मी. पीआरकार्ड महानगरपालिकेच्या नावांवर आहे.

श्री.समीर राजुरकर :दर तीन वर्षाला किती भाडेवाढ करणार आहे.

कार्य.अभियंता (बिओटी):तीन वर्षामध्ये 12 टक्के वाढ करणार आहे. प्रत्येक वर्षाला भाडेवाढ करणार नाही.

श्री.समीर राजुरकर :रूपये 50 प्रति स्के.मी. दर मार्केटनुसार काढलेले आहे का कशापध्दतीने ठरविलेले आहे.

कार्य.अभियंता (बिओटी):टेंडरमध्ये ठरविण्यात आलेले आहे.

श्री.समीर राजुरकर :मार्केटव्हॅल्यु काढण्यात आली होती का?

कार्य.अभियंता (बिओटी):रेडी रेकनरप्रमाणे काढण्यात आली आहे.

श्री.समीर राजुरकर :रेडी रेकनर किती निघाला.

कार्य.अभियंता (बिओटी):75600 रू.पर स्के.मी. फॉर ग्राऊंडफ्लोअर

श्री.समीर राजुरकर :महानगरपालिकेचे कुठलेही नुकसान करून बिओटी करण्यात येवु नये. भविष्यात नागरीकांना या गोष्टींचा बोझा पडणार आहे. ग्राऊंडफ्लोअरचा रेट काढला तसा प्रस्तावात नमुद करायला हवा होता. पार्कीग किती करणार, कोण करणार, नाल्याची साईडवॉल त्यावरती कंन्स्ट्रक्शन

करायला नको, कारण नाथ सुपर मार्केटजवळ आणि त्याच्यापुढे औषधीभवन पुढेपर्यंत पुर्ण नाला लॉक झालेला आहे. नाल्याचे सर्व पाणी भविष्यात औरंगपुरा भागात घुसणार आहे. स्पेसिफिकिशनमध्ये नाल्याच्या साईडमार्जिनमध्ये कुठलीही एस्क्युज करू नये. त्या ठिकाणी राहणाऱ्या नागरीकांना त्याचा त्रास होणार आहे. पुढे मंदिर आहे नाला पुर्ण भागात कव्हर झालेला आहे. साईड मार्जिन कव्हर व्हायला पाहिजे, फ्लोटिंग एफएसआय कुठल्याही पध्दतीत लोड झाला नाही पाहिजे.

**कार्य.अभियंता (बिओटी)** :टेंडर मध्ये अट टाकण्यात आली आहे की, नाला आबाधित ठेवावा नाल्याचा फ्लो, प्रवाह व्यवस्थित ठेवावा.

**मा.सभापती** :स.सदस्यांनी ज्या सूचना या ठिकाणी मांडलेल्या आहेत त्याचे तंतोतंत पालन करण्यात यावे. टेंडरमध्ये सर्व सूचना घेण्यात यावे.

**श्री.समीर राजूरकर** :कालांतराने ड्रेनेज सिस्टीमवर याचा ताण येणार आहे. हे सर्व दैनिक राष्ट्रीय दैनिकात प्रकाशित झाले पाहिजे.

**कार्य.अभियंता (बिओटी)** :तरूण भारत, उर्दु आणि आणखी दोन वर्तमानपत्रामध्ये देण्यात आले होते.

**श्री.समीर राजूरकर** :टेंडर सार्वत्रिक झाले पाहिजे. जीडीपीचा जो टिआरपीचा नॉम दिलेला आहे त्याप्रमाणे लोकल, स्टेट आणि नॅशनल या वर्तमानपत्रात देण्यात यावे.

**मा.सभापती** : विषय क्रमांक 72 मंजूर.

**<u>ठराव :</u>**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेचे औरंगपुरा येथील (1) व्यापारी संकुलाचे (Super Market) पश्चिमेकडील उपलब्ध जागेपैकी 398.00 चौ.मी. आणि (2) औरंगपुरा-निराला बाजार मुख्य रस्त्यावरील सुलभ शौचालय इमारतीचे मागे 884.00 चौ.मी. याप्रमाणे एकत्रित 1282.00 चौ.मी. क्षेत्रावर बी.ओ.टी. तत्वावर व्यापारी संकुल व वाहनतळ 30 वर्षाच्या भाडेपट्टा करारावर विकसीत करण्याकरीता प्राप्त निविदानुसार, मे. पाटील कन्स्ट्रक्शन ॲन्ड इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांचे देकार दर रु.51,00,000/- हे महानगरपालिकेस लाभदायक असल्याने मे.पाटील कन्स्ट्रक्शन ॲन्ड इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांची सदर बी.ओ.टी. प्रकल्पास व 30 वर्षाच्या भाडेपट्टयाच्या करारावर प्रकल्प विकसित करण्यासाठी सर्व अटी व शर्तीसह तसेच भाडेपट्टा दर रुपये 50/- चौ.मी. प्रतिमाह, भाडेपट्टा दरात दर तीन वर्षाने 12% वाढ करून 30 वर्षानंतर संपुर्ण प्रकल्प महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच पुढील मंजुरीस्तव मा.सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**<u>विषय क्र. 73 :</u>**

**प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेचे औरंगपुरा येथील अस्तित्वातील भाजी मंडी बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करण्याची संकल्पना आहे. सदर प्रकल्पासाठी 1471.00 चौ.मी. व भाजी मंडी समोरील जागा 365.75 चौ.मी. तसेच नाल्यावरील वाहनतळासाठी 243.60 चौ.मी. क्षेत्रावर वाहणाऱ्या नाल्याचा प्रवाह अबाधित ठेवुन वाहनतळ क्षेत्र बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करावयाचा आहे. करिता उक्त प्रस्तावित केल्यानुसार एकत्रित जागेवर तीस (30) वर्षाच्या भाडेपट्टा तत्वावर प्रकल्प विकसीत करण्याचा प्रस्तावास दिनांक 10.08.2012 रोजी संपन्न झालेल्या बीओटी समितीने परवानगी दिलेली आहे. सदर प्रकल्पाची अंदाजित रक्कम रुपये 11.70 कोटी असुन प्रकल्प पुर्ण करण्यासाठी 18 महिन्याची मुदत आहे.**

**त्या अनुषंगाने औरंगपुरा भाजी मंडी तीस (30) वर्षाच्या भाडेपट्टा कालावधीसाठी बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करणेस जा.क्र./मनपा/ई-निविदा/2012/79, दिनांक 07.09.2012 नुसार वर्तमान पत्रात प्रसिध्द करुन निविदा प्रकाशीत करण्यात आल्या.**

**निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक 21.09.2012 रोजी पावेतो एकूण दोन निविदा दाखल झाल्या असता, त्यांची तांत्रिक पात्रता उघडण्यात आली असता, पात्र झालेल्या निविदा धारकांनी दाखल केलेले नापरतावा रकमेचा तपशिल खालील प्रमाणे.**

| अ. क्र. | निविदा धारकाचे नांव | नापरतावा रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1 | मे.पाटील कन्स्ट्रक्शन ॲन्ड इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. तिसरा मजला, पीएमपीएमएल बिल्डींग न.01, आयकर कार्यालयाच्या समोर, शंकरसेठ रोड, स्वारगेट पुणे. | 31,00,000/- |
| 2 | मे.पी.पी. खारपाटील कन्स्ट्रक्शन प्रा.लि., चिरनार, ता.उरण, जिल्हा रायगड | 11,00,000/- |

**निविदेतील सर्व अटी व शर्तीसह सदर देकार दर प्रिमियम रुपये 31,00,000/- मनपासाठी लाभदायक असुन सदर देकार दरास मा. आयुक्त यांनी मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच भाडेपट्टा दर रुपये 100/- चौ.मी. प्रतिमाह मिळणार असुन भाडेपट्टा दरात दर तीन वर्षाने 12% वाढ होणार आहे व 30 वर्षानंतर संपुर्ण प्रकल्प महानगरपालिकेस हस्तांतरीत होणार आहे.**

**सदर प्रकल्पा अंतर्गत महानगरपालिकेला मिळणारे उत्पन्न खालील प्रमाणे आहे.**

**1) मनपा हिश्यातील तळ मजल्यावरील दुकाने व ओटे बांधण्यासाठीचा अंदाजे खर्च रुपये 3.22 कोटी. तसेच बेसमेंट फ्लोअर मधील वाहनतळ मनपाचा हिस्सा म्हणुन राहणार आहे.**
**2) प्रिमियम रक्कम रुपये 31,00,000/-**
**3) विकासक हिश्यातील बांधकाम क्षेत्रावर भाडेपट्टा दर रुपये 100/- प्रती चौ.मी. प्रती माह या प्रमाणे एक वर्षासाठी रुपये 43,21,380/- एवढा प्राप्त होणार असुन सदर भाडेपट्टा दरात दर तीन वर्षाने 12% वाढ होणार असुन त्या प्रमाणात 30 वर्षात अंदाजे रुपये 14,13,38,736/- एवढे उत्पन्न मनपास मिळणार आहे.**
**4) मनपा हिश्यातील इमारत मनपाकडून भाडेतत्वावर दिल्यानंतर भाडेपट्टा दराच्या स्वरुपात आर्थिक उत्पन्न मिळणार आहे.**
**5) विकासक हिश्यातील व मनपा हिश्यातील बांधकामावर मालमत्ता कराच्या स्वरुपात आर्थिक उत्पन्न मिळणार आहे.**
**6) 30 वर्षानंतर संपुर्ण प्रकल्प मनपास हस्तांतरीत होणार आहे.**

**तरी मे. पाटील कन्स्ट्रक्शन ॲन्ड इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांचे देकार दर रु.31,00,000/- हे महानगरपालिकेस लाभदायक असल्याने मे. पाटील कन्स्ट्रक्शन ॲन्ड इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांची सदर बी.ओ.टी. प्रकल्पासाठीचे निविदा दर व 30 वर्षाच्या भाडेपट्टयाच्या करारावर प्रकल्प विकसित करण्यासाठी निविदा दराचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरी प्राप्त होवुन पुढील मंजुरीस्तव मा. सर्व साधारण सभागृहाच्या मंजुरीस्तव सादर करणेसाठी विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.**

**मा.सभापती : विषय क्रमांक 73 मंजूर.**

**<u>ठराव :</u>**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेचे औरंगपुरा येथील अस्तित्वातील भाजी मंडी बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करणे अंतर्गत सदर प्रकल्पासाठी 1471.00 चौ.मी. व भाजी मंडी समोरील जागा 365.75 चौ.मी. तसेच नाल्यावरील वाहनतळासाठी 243.60 चौ.मी. क्षेत्रावर वाहणाऱ्या नाल्याचा प्रवाह अबाधित ठेवुन वाहनतळ क्षेत्र बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करणे व औरंगपुरा भाजी मंडी तीस (30) वर्षाच्या भाडेपट्टा कालावधीसाठी विकसीत करण्याकरीता प्राप्त निविदेनुसार मे. पाटील कन्स्ट्रक्शन ॲन्ड इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांचे देकार दर रु.31,00,000/- हे महानगरपालिकेस लाभदायक असल्याने मे.पाटील कन्स्ट्रक्शन ॲन्ड इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांची सदर बी.ओ.टी. प्रकल्पास व 30 वर्षाच्या भाडेपट्टयाच्या करारावर प्रकल्प विकसित करण्यासाठी सर्व अटी व शर्तीसह तसेच भाडेपट्टा दर रुपये 100/- चौ.मी. प्रतिमाह, भाडेपट्टा दरात दर तीन वर्षाने 12% वाढ करून 30 वर्षानंतर संपुर्ण प्रकल्प महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच पुढील मंजुरीस्तव मा.सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**<u>विषय क्र. 74 :</u>**

**प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेचे शहागंज येथील अस्तित्वातील भाजी मंडी बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करण्याची संकल्पना आहे. सदर प्रकल्पासाठी 6754.30 चौ.मी. क्षेत्र बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करावयाचा आहे. करिता उक्त प्रस्तावित केल्यानुसार तीस (30) वर्षाच्या भाडेपट्टा तत्वावर प्रकल्प विकसीत करण्याचा प्रस्तावास दिनांक 10.08.2012 रोजी संपन्न झालेल्या बीओटी समितीने परवानगी दिलेली आहे. सदर प्रकल्पाची अंदाजित रक्कम रुपये 21.50 कोटी असुन प्रकल्प पुर्ण करण्यासाठी 18 महिन्याची मुदत आहे.**

**त्या अनुषंगाने शहागंज भाजी मंडी तीस (30) वर्षाच्या भाडेपट्टा कालावधीसाठी बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करणेस जा.क्र./मनपा/ई-निविदा/2012/78, दिनांक 07.09.2012 नुसार वर्तमान पत्रात प्रसिध्द करुन निविदा प्रकाशीत करण्यात आल्या.**

निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक 21.09.2012 रोजी पावेतो एक निविदा दाखल झाली असता, त्याची तांत्रिक पात्रता उघडण्यात आली असता, पात्र झालेल्या निविदा धारकांनी दाखल केलेले नापरतावा रकमेचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ. क्र. | निविदा धारकाचे नांव | नापरतावा रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1 | मे.पाटील कन्स्ट्रक्शन ॲन्ड इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. तिसरा मजला, पीएमपीएमएल बिल्डींग न.01, आयकर कार्यालयाच्या समोर, शंकरसेठ रोड, स्वारगेट पुणे. | 21,00,000/- |

निविदेतील सर्व अटी व शर्तीसह सदर देकार दर प्रिमियम रुपये 21,00,000/- मनपासाठी लाभदायक असुन सदर देकार दरास मा. आयुक्त यांनी मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच भाडेपट्टा दर रुपये 100/- चौ.मी. प्रतिमाह मिळणार असुन भाडेपट्टा दरात दर तीन वर्षाने 12% वाढ होणार आहे व 30 वर्षानंतर संपुर्ण प्रकल्प महानगरपालिकेस हस्तांतरीत होणार आहे.

सदर प्रकल्पा अंतर्गत महानगरपालिकेला मिळणारे उत्पन्न खालील प्रमाणे आहे.

1) मनपा हिश्यातील तळ मजल्यावरील 5000 चौ.मी. क्षेत्र ज्यामध्ये 200 दुकाने आणि 120 ओटे तसेच 500.00 चौ.मी. चा दवाखाना व त्यासाठी लागणारे वाहनतळ व इतर इन्फ्रास्ट्रक्चर बांधण्यासाठीचा अंदाजे खर्च रुपये 10.74 कोटी.

2) प्रिमियम रक्कम रुपये 21,00,000/-

3) विकासक हिश्यातील बांधकाम क्षेत्रावर भाडेपट्टा दर रुपये 100/- प्रती चौ.मी. प्रती माह व वाहनतळासाठी रुपये 10/- प्रती चौ.मी. प्रती माह या प्रमाणे एक वर्षासाठी रुपये 63,11,683/- एवढा प्राप्त होणार असुन सदर भाडेपट्टा दरात दर तीन वर्षाने 12% वाढ होणार असुन त्या प्रमाणात 30 वर्षात अंदाजे रुपये 33,22,86,184/- एवढे उत्पन्न मनपास मिळणार आहे.

4) मनपा हिश्यातील इमारत मनपाकडून भाडेतत्वावर दिल्यानंतर भाडेपट्टा दराच्या स्वरुपात आर्थिक उत्पन्न मिळणार आहे.

5) विकासक हिश्यातील व मनपा हिश्यातील बांधकामावर मालमत्ता कराच्या स्वरुपात आर्थिक उत्पन्न मिळणार आहे.

6) 30 वर्षानंतर संपुर्ण प्रकल्प मनपास हस्तांतरीत होणार आहे.

तरी मे. पाटील कन्स्ट्रक्शन ॲन्ड इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांचे देकार दर रु.21,00,000/- हे महानगरपालिकेस लाभदायक असल्याने मे. पाटील कन्स्ट्रक्शन ॲन्ड इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांची सदर बी.ओ.टी. प्रकल्पासाठीचे निविदा दर व 30 वर्षाच्या भाडेपट्टयाच्या करारावर प्रकल्प विकसित करण्यासाठी निविदा दराचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरी प्राप्त होवुन पुढील मंजुरीस्तव मा.सर्व साधारण सभागृहाच्या मंजुरीस्तव सादर करणेसाठी विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 74 मंजूर.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेचे शहागंज येथील अस्तित्वातील भाजी मंडी बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करणे अंतर्गत सदर प्रकल्पासाठी 6754.30 चौ.मी. क्षेत्रावर शहागंज भाजी मंडी तीस (30) वर्षाच्या भाडेपट्टा कालावधीसाठी विकसीत करण्याकरीता प्राप्त निविदेनुसार मे. पाटील कन्स्ट्रक्शन ॲन्ड इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांचे देकार दर रु.21,00,000/- हे महानगरपालिकेस लाभदायक असल्याने मे.पाटील कन्स्ट्रक्शन ॲन्ड इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांची सदर बी.ओ.टी. प्रकल्पास व 30 वर्षाच्या भाडेपट्टयाच्या करारावर प्रकल्प

विकसित करण्यासाठी सर्व अटी व शर्तीसह तसेच भाडेपट्टा दर रुपये 100/- चौ.मी. प्रतिमाह, भाडेपट्टा दरात दर तीन वर्षाने 12% वाढ करून 30 वर्षानंतर संपुर्ण प्रकल्प महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच पुढील मंजुरीस्तव मा.सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 75 :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेचे न.भू.क्र.5739 येथील वसंत भवन ही इमारत बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करण्याची संकल्पना आहे. सदर प्रकल्पासाठी 1418.00 चौ.मी. जागेवर तीस (30) वर्षाच्या भाडेपट्टा तत्वावर प्रकल्प विकसीत करण्याचा प्रस्तावास दिनांक 10.08.2012 रोजी संपन्न झालेल्या बीओटी समितीने परवानगी दिलेली आहे. सदर प्रकल्पाची अंदाजित रक्कम रुपये 5.65 कोटी असुन प्रकल्प पुर्ण करण्यासाठी 18 महिन्याची मुदत आहे.

त्या अनुषंगाने न.भू.क्र.5739 येथील वसंत भवन ही इमारत तीस (30) वर्षाच्या भाडेपट्टा कालावधीसाठी बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करणेस जा.क्र./मनपा/ई-निविदा/2012/80, दिनांक 07.09.2012 नुसार वर्तमान पत्रात प्रसिध्द करुन निविदा प्रकाशीत करण्यात आल्या.

निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक 21.09.2012 रोजी पावेतो एकूण दोन निविदा दाखल झाल्या असता, त्यांची तांत्रिक पात्रता उघडण्यात आली असता, पात्र झालेल्या निविदा धारकांनी दाखल केलेले नापरतावा रकमेचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ. क्र. | निविदा धारकाचे नांव | नापरतावा रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1 | मे.पाटील कन्स्ट्रक्शन ॲन्ड इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. तिसरा मजला, पीएमपीएमएल बिल्डींग न.01, आयकर कार्यालयाच्या समोर, शंकरसेठ रोड, स्वारगेट पुणे. | 1,08,00,000/- |
| 2 | मे.पी.पी. खारपाटील कन्स्ट्रक्शन प्रा.लि., चिरनार, ता.उरण, जिल्हा रायगड | 51,00,000/- |

निविदेतील सर्व अटी व शर्तीसह सदर देकार दर प्रिमियम रुपये 1,08,00,000/- मनपासाठी लाभदायक असुन सदर देकार दरास मा. आयुक्त यांनी मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच भाडेपट्टा दर रुपये 100/- चौ.मी. प्रतिमाह व वाहनतळ क्षेत्रासाठी रुपये 10/- प्रती चौ.मी. प्रती माह या प्रमाणे मिळणार असुन भाडेपट्टा दरात दर तीन वर्षाने 12% वाढ होणार आहे व 30 वर्षानंतर संपुर्ण प्रकल्प महानगरपालिकेस हस्तांतरीत होणार आहे.

सदर प्रकल्पा अंतर्गत महानगरपालिकेला मिळणारे उत्पन्न खालील प्रमाणे आहे.

1) मनपा हिश्यातील दुसऱ्या मजल्यावरील 300.00 चौ.मी. क्षेत्राचे बांधकामासाठीचा अंदाजे खर्च रुपये 64.56 लक्ष.

2) प्रिमियम रक्कम रुपये 1,08,00,000/-

3) विकासक हिश्यातील बांधकाम क्षेत्रावर भाडेपट्टा दर रुपये 100/- प्रती चौ.मी. प्रती माह या प्रमाणे एक वर्षासाठी रुपये 31,90,000/- एवढा प्राप्त होणार असुन सदर भाडेपट्टा दरात दर तीन वर्षाने 12% वाढ होणार असुन त्या प्रमाणात 30 वर्षात अंदाजे रुपये 12,25,00,000/- एवढे उत्पन्न मनपास मिळणार आहे.

4) मनपा हिश्यातील इमारत मनपाकडून भाडेतत्वावर दिल्यानंतर भाडेपट्टा दराच्या स्वरुपात आर्थिक उत्पन्न मिळणार आहे.

5) विकासक हिश्यातील व मनपा हिश्यातील बांधकामावर मालमत्ता कराच्या स्वरुपात आर्थिक उत्पन्न मिळणार आहे.
6) 30 वर्षानंतर संपुर्ण प्रकल्प मनपास हस्तांतरीत होणार आहे.

तरी मे. पाटील कन्स्ट्रक्शन ॲन्ड इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांचे देकार दर रुपये 1,08,00,000/- हे महानगरपालिकेस लाभदायक असल्याने मे. पाटील कन्स्ट्रक्शन ॲन्ड इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांची सदर बी.ओ.टी. प्रकल्पासाठीचे निविदा दर व 30 वर्षाच्या भाडेपट्टयाच्या करारावर प्रकल्प विकसित करण्यासाठी निविदा दराचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरी प्राप्त होवुन पुढील मंजुरीस्तव मा. सर्व साधारण सभागृहाच्या मंजुरीस्तव सादर करणेसाठी विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

संवाद :

श्री.समीर राजुरकर :बीओटीचे कुठलेही करार पारदर्शक असले पाहिजे. औरंगपुरा भाजीमंडई येथे मनपाचे एएमसी कंम्पोनंट असणार आहे का?

कार्य.अभियंता (बिओटी) :पुर्ण ग्राऊंड फ्लोअर एमएमसी कंम्पोनंट आहे. 140 ओटे आणि 32 दुकाने एएमसी कंम्पोनंटमध्ये तयार करून देणार आहे. ओटयासाठी 5 ते 6 मीटर आणि बांधकाम कशापध्दतीचे असेल. 11 ते 12 मीटरचे शॉप असणार आहे.

मा.सभापती :विषय मंजूर

श्री.समीर राजुरकर :शहागंजसाठी एकच टेंडर आलेले आहे.

कार्य.अभियंता (बिओटी) :ई टेंडरींगद्वारे टेंडर आलेले आहे.

श्री.समीर राजुरकर :तीन टेंडर आल्याशिवाय मंजूर करु शकतो का?

मा.सभापती :विषय क्रमांक 75 मंजूर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेचे न.भू.क्र.5739 येथील वसंत भवन ही इमारत बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करणे अंतर्गत सदर प्रकल्पासाठी 1418.00 चौ.मी. जागेवर तीस (30) वर्षाच्या भाडेपट्टा कालावधीसाठी विकसीत करण्याकरीता प्राप्त निविदेनुसार, मे. पाटील कन्स्ट्रक्शन ॲन्ड इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांचे देकार दर रु.1,08,00,000/- हे महानगरपालिकेस लाभदायक असल्याने मे.पाटील कन्स्ट्रक्शन ॲन्ड इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांची सदर बी.ओ.टी. प्रकल्पास व 30 वर्षाच्या भाडेपट्टयाच्या करारावर प्रकल्प विकसित करण्यासाठी सर्व अटी व शर्तीसह तसेच भाडेपट्टा दर रुपये 100/- चौ.मी. प्रतिमाह, भाडेपट्टा दरात दर तीन वर्षाने 12% वाढ करून 30 वर्षानंतर संपुर्ण प्रकल्प महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच पुढील मंजुरीस्तव मा.सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 76 :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अग्निशमन विभागासाठी अग्निशमन व आणीबाणी सेवेत काम करण्यास सुसज्ज असे लहान वाहनाची अत्यंत आवश्यकता आहे.

1. भारत सरकारच्या आपत्कालीन व्यवस्थापन कायदा 2005 नुसार व महाराष्ट्र शासनाच्या धोरणात्मक निर्णय क्र.डीएमयु-2006/सीआर-11/डीएम-1,मंत्रालय,मुंबई-32, दि.25/07/2006 नुसार औरंगाबाद महानगरपालिकेने "विभागीय आपत्कालीन व्यवस्थापन केंद्र" स्थापन केलेले आहे. औरंगाबाद जिल्हा/जालना जिल्हा/बीड जिल्ह्यासाठी शोध व बचाव कार्य पथकाला आपत्कालीन सेवा देणे बंधनकारक आहे.

2. प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापन करण्यासाठी मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद यांच्याकडुन मौजे करोडी ता.जि.औरंगाबाद येथे गट नंबर 24 मधील 7

एकर 26 गुंठे जमीन अग्निशमन दलास ताब्यात मिळालेली आहे. त्याठिकाणी सुसज्ज असे प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापन करून संकट समयी अग्निशमन दलास सेवा देणे क्रमप्राप्त आहे.

3. महाराष्ट्र शासनाच्या धोरणात्मक निर्णय दिनांक 25/07/2006 नुसार "शोध व बचाव कार्य प्रमुख" म्हणुन मुख्य अग्निशमन अधिकारी व इतर अग्निशमन अधिकारी यांना निर्देशीत केलेले आहे.

4. सन 2006 मध्ये औरंगाबाद व औरंगाबाद जिल्ह्यात पावसाळयात शोध व बचाव कार्य पथकाने उत्कृष्टपणे सेवा पुरविली होती. जसे कावसान (जुने) पैठण येथुन 23 नागरीकांना पैठण नदीच्या सर्वात मोठ्या पुरातुन सुखरूप बाहेर काढण्याचे काम शोध व बचाव कार्य पथकाने केलेले आहे.

5. औरंगाबाद/बीड/जालना जिल्ह्यातुन गोदावरी नदी वाहत आहे, त्यामुळे वेळोवेळी शोध व बचाव कार्य पथकाला या तीनही जिल्ह्यामध्ये जीवित व वित्तहानी वाचवण्यासाठी आपत्कालीन व्यवस्थापन कायदा 2005 नुसार कार्य करणे बंधनकारक आहे.

6. दिनांक 30/06/2011 रोजी सिल्लोड तालुक्यातील बनकिन्होळा गावांजवळ एस.टी. महामंडळाच्या बसला (एम.एच.-20 डी 8159) अपघात झाला व बस 300 फुट अंतरावर असलेल्या विहीरीत जाऊन पडली. याठिकाणी अग्निशमन दलाने त्वरीत एक अग्निशमन वाहन व एक रूग्णवाहिकासह 03 अधिकारी व 06 कर्मचारी यांना मदतीसाठी पाठवुन 5 जखमी झालेल्या व्यक्तींना व 18 मृत व्यक्तींना विहीरीबाहेर काढले व जखमींना त्वरीत दवाखान्यात दाखल करण्यात आले.

7. शहर आपत्ती व्यवस्थापन समिती स्थापन केली आहे. त्याचे मा.आयुक्त, अध्यक्ष म्हणुन व मुख्य अग्निशमन अधिकारी, नोडल ऑफिसर म्हणुन यांना नामनिर्देशीत केले आहे. तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीमध्ये मुख्य अग्निशमन अधिकारी, इतर अग्निशमन अधिकारी याना प्रमुख शोध व बचाव कार्य पथक-1 मध्ये नामनिर्देशीत केलेले आहे.

8. अग्निशमन विभाग हा औरंगाबाद शहर व मराठवाडा विभागातील 8 जिल्ह्यातील कोणतीही आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी 24 तास सज्ज असणार आहे. आपत्कालीन परिस्थिती (Disaster Management) ज्यामध्ये भुकंप/चक्रीवादळ/महापूर/रोड अपघात/मोठ्या आगी/ एल.पी.जी.लीकेज/रस्त्यावरील केमीकल अपघात/आतंकवाद्यांनी/अतिरेक्यांनी घडवून आणलेले स्फोट/दंगली इत्यादी साठी कमीतकमी वेळेत जाऊन संभाव्य जिवीत व वित्तहानी वाचवण्याची कार्यवाही करावी लागणार आहे. अलीकडील काळात औरंगाबाद शहर व काही जिल्हे हे अतिसंवेदनशील म्हणुन ओळखले जात आहेत.

9. शासन निर्णय अधिनियम क्र.अशस.1408/1491/प्र.क्र.221/08/नवि-20, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-32, दि.06/12/2008 नुसार संपुर्ण राज्यामध्ये महाराष्ट्र शासनाने 6 डिसेंबर 2008 मध्ये सर्व निवासी व उद्योग/व्यवसाय यासाठी आगीच्या दुर्घटनेमध्ये जनतेची होणारी संभाव्य जिवीत व वित्तहानी कमी करण्यासाठी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम 2006.

10. आपत्ती समयी औरंगाबाद/जालना/बीड व मराठवाड्यातील इतर जिल्हामध्ये संकटसमयी मदत पोहचवितांना जसे रेस्क्यु साहित्य/बोटी/अधिकारी व कर्मचारी व इतर मदत पोहचविणे अत्यंत जरूरीचे असते व ती वेळेत पोहचल्यास कमीत कमी जिवीत व वित्तहानी होण्यास मदत होते व लोकांची संकटातुन सुटका करणे शक्य होऊ शकते. शोध व बचाव कार्यासाठी अग्निशमन दलास बोलेरो (SLX) हे वाहन खरेदी करणे अत्यंत आवश्यक आहे.

11. अग्निशमन विभाग मुंबई/ठाणे/पुणे/पिंपरी चिंचवड/नाशिक या ठिकाणी आपत्ती समयी काम करण्यास अशा प्रकारच्या सुसज्ज लहान वाहनाची उपलब्धता करून देण्यात आलेली आहे.

12. शासन निर्णय नगरविकास विभाग, मंत्रालय, क्र.अशस 1407/360/प्र.क्र.211/नवि-20, दिनांक 31/08/2009 नुसार औरंगाबाद शहरासाठी अग्निसुरक्षा अभियान अंतर्गत (जनगणना सन 2001 नुसार) एकुण आठ अग्निशमन केंद्र असणे आवश्यक आहे. त्यापैकी सध्या तीन अग्निशमन केंद्र चालु असून पाच अग्निशमन केंद्र व सात अग्निशमन वाहने व दोन जीपची कमतरता आहे. औरंगाबाद शहरासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) तयार करून जा.क्र.मनपा/अशाद/1112/2011 दिनांक 16/09/2011 नुसार अहवाल शासनास सादर करण्यात येऊन या अहवालास शासनाकडून मान्यता मिळालेली आहे. यानुसार सात अग्निशमन वाहने व दोन जीपसाठी शासन निर्णयानुसार एकूण खर्च 2.10 कोटी खर्च करण्यास मंजुरी मिळालेली आहे. यापैकी महाराष्ट्र शासनाचे 35% हिस्सानुसार रूपये 1 कोटी 78 लाख 50 हजार जमा आहेत.

13. रत्नप्रभा मोटार्स, औरंगाबाद यांच्या कोटेशननुसार महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे बोलेरो (ZLX BS III) या वाहनासाठी रूपये 9,37,997/- (अक्षरी नऊ लाख सदोतीस हजार नऊशे सत्यानऊ रूपये) खर्च येणार आहे.

| Model No. | Bolero -ZLX, BS III |
|---|---|
| Showroom Price | Rs. 7,10,200/- |
| Insurance Charges | Rs. 29,110/- |
| R.T.O. Registration Charges & Road Tax | Rs. 1,60,394/- |
| LBT & Other | Rs. 38,293/- |
| Total | Rs.9,37,997/- |

वर नमूद तपशीलानुसार रत्नप्रभा मोटार्स, औरंगाबाद यांच्याकडून बोलेरो (ZLX BS III) वाहन खरेदी व लागणाऱ्या खर्चाचा प्रस्ताव (BPMC Act 1949 चे कलम 76 व 77 नुसार) शिफारसीसह मंजुरीस्तव सादर.

<u>संवाद :</u>

श्री.समीर राजुरकर :विषयाबाबत खुलासा करण्यात यावा.

अग्निशमन अधिकारी :अग्निशमन दलासाठी औरंगाबाद शहरासाठी 8 अग्निशमन केंद्र मंजूर झ ालेले आहेत. 5 अग्निशमन केंद्र बांधावयाचे आहेत. 7 अग्निशमन वाहने व 2 जीप खरेदी करावयाचा आहे त्यासाठी शासनाचे 1 कोटी 76 लाख रूपये जमा झालेले आहेत. वाहनाचे पैसे शासन देणार आहे. बांधकाम महापालिकेने करावयाचे आहे. ज्युनिअर ऑफिसरसाठी वाहनाचा प्रस्ताव ठेवलेला आहे.

मा.सभापती :विषय मंजूर.

मा.सभापती :भगवान महावीर संशोधन केंद्रासाठी आर्कीटेक/वास्तुविशारद नेमणे यासाठी अंदाजीत दराच्या 1.5 टक्के दराच्या प्रस्ताव मान्यतेस्तव सादर आहे. मंजूर

मा.सभापती :हर्सुल तलावातील माती गाळ संबधीचा विषय आलेला आहे. माहिती देण्यात यावी.

कार्य.अभियंता (पा/पू) :पावसाळा कमी झालेला आहे त्यामुळे हर्सुल तलाव आटलेला आहे. त्यामुळे हर्सुल तलावाचा गाळ काढण्याची संधी आहे. इन्सपेरा लिजर हॉस्पीटीलिटी कंपनी लि. हे स्वखर्चाने गाळ काढुन देणार आहे. गाळ कंपणी घेणार आहे. महापालिकेला कुठलाही खर्च करावा लागणार नाही. त्यासाठी प्रस्ताव स्थायी समितीसमोर मंजूरीस्तव ठेवण्यात आलेला आहे.

मा.सभापती :विषय मंजूर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अग्निशमन विभागासाठी अग्निशमन व आणीबाणी सेवेत काम करण्यास सुसज्ज असे लहान वाहनाची आवश्यकता असल्यामुळे रत्नप्रभा मोटार्स, औरंगाबाद यांच्या कोटेशननुसार महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे बोलेरो (ZLX BS III) हे वाहन खरेदी करण्यास व त्यासाठी लागणाऱ्या रक्कम रूपये 9,37,997/- (अक्षरी नऊ लाख सदोतीस हजार नऊशे सत्यानऊ रूपये) च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 77 :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ.मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र लगतच्या पश्चिम भागातील खुल्या जागेवर भगवान महावीर संशोधन केंद्राची उभारणी करणे या प्रस्तावा अंतर्गत सदर वास्तुचे सविस्तर अंदाजपत्रक नकाशे, तयार करणे करीता महानगरपालिका पॅनलवरील वास्तु विशारद मे.राका ॲण्ड असोसिएटस यांची नियुक्त अंदाजपत्रकीय दराच्या 1.5% मानधनावर करण्यास मा.आयुक्त महोदय यांनी शिफारस केलेली आहे.

त्याअनुषंगाने वास्तू विशारद मे.राका ॲण्ड असोसिएटस यांचेकडून सदर काम अंदाजपत्रकीय दराच्या 1.5% दराने करून घेणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र लगतच्या पश्चिम भागातील खुल्या जागेवर भगवान महावीर संशोधन केंद्राची उभारणी करणे या प्रस्तावा अंतर्गत सदर वास्तुचे सविस्तर अंदाजपत्रक, नकाशे, तयार करण्याचे काम महानगरपालिका पॅनलवरील वास्तु विशारद मे.राका ॲण्ड असोसिएटस यांचेकडून अंदाजपत्रकीय दराच्या 1.5% दराने करून घेणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 78 :

कार्यकारी अभियंता (वार्ड ब व क), महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, इन्स्पिरा लेझर ॲण्ड हॉस्पिटालिटी लिमिटेड कंपनीने महानगरपालिकेस हर्सुल तलाव येथील गाळ/माती काढणे, तसेच तलावात असलेल्या छोट्या-छोट्या उंचवट्यांचा भाग काढुन टाकून त्याद्वारे निघालेली माती सदर कंपनीस विनामुल्य देणेस्तव व तसेच निघालेल्या माती/गाळ यामुळे जो अतिरिक्त पाणीसाठा तयार होईल, त्या पाणीसाठ्यातून औरंगाबाद महानगरपालिकेची गरज भागवून उरलेले पाणी त्या त्या वेळेच्या परिस्थितीनुसार निर्णय घेऊन कंपनीस विनामुल्य देणेबाबत विनंती केलेली आहे.

त्या अनुषंगाने मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. तसेच निघालेल्या गाळ/माती रॉयल्टीमध्ये सुट बाबत प्रकरण जिल्हा प्रशासनाकडे विचारार्थ व नियमाप्रमाणे सुट मिळणेस्तव पाठविता येईल.

तथापी संबंधीत कंपनीद्वारे काढण्यात येणारा गाळ/माती व उर्वरीत असणारे पाणी कंपनीस विनामुल्य देण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

श्री.समीर राजुरकर :वार्डामध्ये एकच विहीर होऊ शकते असे स.नगरसेवकांना कळविण्यात यावे. मागील वर्षी प्रशासनाने सर्वे केलेला आहे.

कार्य.अभियंता (पा/पू) :मागील वर्षीच्या कित्येक विहीरी बुजून गेलेल्या असतील.

मा.सभापती :गणपती उत्सवाच्या पुर्वी विहीरीमध्ये मुंकूदवाडी येथे जी घटना घडलेली आहे त्याची पुनरावृत्ती होऊ नये. प्रशासनाने ऐनवेळी नियोजन न करता आजपासूनच प्लॅनिंग केले पाहिजे.

मालमत्तांचे व्हॅल्युएशनसाठी एसबीएच असो. यांना नेमण्यात आलेले आहे. त्यांच्या मान्यतेसाठी स्थायी समितीसमोर आलेले आहे. 5 लाख रूपये आहे.

कार्य.अभियंता (पा/पू) :200 कोटीचे कर्ज घ्यावयाचे आहे त्यासाठी 300 कोटी रूपयांची सेक्युरिटी द्यावयाची आहे. बॅकेच्या नियमाप्रमाणे मालमत्तांचे व्हॅल्युएशन करून द्यावयाचे आहे. हुडकोचे 185 कोटी रूपयांचे कर्ज घ्यावयाचे आहे. या दोन्हींसाठी त्यांची नेमणुक केली आहे.

श्री.समीर राजुरकर :मालमत्ता विभागाला आदेशीत करावे की, मनपाच्या ओपन स्पेसचे माहिती / डाटा तयार करून घ्यावे.

मा.सभापती :ड्रेनेज आणि वॉटर सप्लाय हा शहरासाठी महत्वाचा मुद्दा आहे. ऐनवेळचे विषय मंजूर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इन्स्पिरा लेझर ॲण्ड हॉस्पिटालिटी लिमिटेड कंपनीने हर्सुल तलाव येथील गाळ/माती काढणे, तसेच तलावात असलेल्या छोट्या-छोट्या उंचवट्यांचा भाग काढुन टाकून त्याद्वारे निघालेली माती सदर कंपनीस विनामुल्य देणेस्तव व तसेच निघालेल्या माती/गाळ यामुळे जो अतिरिक्त पाणीसाठा तयार होईल, त्या पाणीसाठ्यातून औरंगाबाद महानगरपालिकेची गरज भागवून उरलेले पाणी त्या त्या वेळेच्या परिस्थितीनुसार निर्णय घेऊन कंपनीस विनामुल्य देणेबाबत विनंती केल्यानुसार कंपनीद्वारे काढण्यात येणारा गाळ/माती व उर्वरीत असणारे पाणी कंपनीस विनामुल्य देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 79 :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या मालकीच्या खुल्या जागा व इतर मालमत्तेचा सर्व्हे करणे व त्याची आजच्या बाजार भावानुसार किमंत ठरविणे या कामासाठी मे.एस.बी.एस. ॲण्ड असोसिएटस् यांनी रक्कम रू.7.50 लक्ष असे दर दरपत्रकात नमुद केलेले होते. तथापी वाटाघाटी अंती रक्कम रू.300.00 कोटीच्या मालमत्तेपर्यंतचे काम रक्कम रू.5.00 लक्ष अधिक इतर करासहीत व 300.00 कोटी रूपयांच्या वर सदर काम गेल्यास प्रती कोटी रक्कम रू.1500/- अधिक इतर करासहीत असे दर त्यांचे दर पत्रकात दाखल केलेले आहेत.

तथापी महानगरपालिकेच्या एकुण 27 मालमत्तेचे सर्व्हे करून आजच्या बाजार भावानुसार किमंत ठरविणेच्या कामापोटी मे.एस.बी.एस. असोसिएटस यांना रक्कम रू.5.00 लक्ष अदा करण्यास मा.आयुक्त महोदय यांनी शिफारस केलेली आहे. त्याअनुषंगाने वास्तु विशारद मे.एस.बी.एस. असोसिएटस यांच्याकडून सदर काम करून घेऊन कामाच्या पोटी रक्कम रू.5.00 लक्ष अदा करणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीच्या खुल्या जागा व इतर मालमत्तेचा सर्व्हे करणे व त्याची आजच्या बाजार भावानुसार किमंत ठरविणे या कामासाठी मे.एस.बी.एस. ॲण्ड असोसिएटस् यांनी दिलेल्या दरपत्रकानुसार त्यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे रक्कम रू.300.00 कोटीच्या मालमत्तेपर्यंतचे सर्व्हे करून आजच्या बाजारभावानुसार किंमत ठरविणेचे काम करून घेऊन कामाच्या पोटी रक्कम रू.5.00 लक्ष अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 80 :

मा.आयुक्त, यांच्या मान्यतेने मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील सिडको एन-9 एम-2 येथील कम्युनिटी सेंटरचा भाग असलेला पहिल्या मजल्यावरील हॉल श्री.राहुल म्हस्के यांनी पुल टेबल चालविण्यासाठी भाडे तत्वावर

मिळणे बाबत मागणी केली आहे. त्या अनुषंगाने सदरील एकत्रित कम्युनिटी सेंटरच्या 3 हॉल + 1 स्वयंपाकगृह, स्वच्छतागृह असा एकूण GF +1 असलेल्या 691.00 चौ.मी. क्षेत्रापैकी सदरील हॉलचे क्षेत्रफळ 46.14 चौ.मी. एवढे होते. यानुसार प्रतिमाह भाडे असून सन 2012 च्या सिध्द शिघ्र गणकाचे भाडे रू.6100/- प्रतिमाह एवढे आकारून मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम व सेवा शुल्क, सेवाकर व याशिवाय मालमत्ता कर, इतर कर इत्यादीसह नेहमीच्या महानगरपालिकेच्या अटी/शर्तीस अधिन राहुन तीन वर्षाचे कालावधी करीता हॉल भाडे तत्वावर देण्याकरीता झालेल्या मान्यता संबंधाने प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील सिडको एन-9 एम-2 येथील कम्युनिटी सेंटरचा भाग असलेला पहिल्या मजल्यावरील हॉल श्री.राहुल म्हस्के यांना पुल टेबल चालविण्यासाठी सन 2012 च्या सिध्द शिघ्र गणकाचे भाडे रू.6100/- प्रतिमाह एवढे आकारून मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम व सेवा शुल्क, सेवाकर व याशिवाय मालमत्ता कर, इतर कर इत्यादीसह नेहमीच्या महानगरपालिकेच्या अटी/शर्तीस अधिन राहुन तीन वर्षाचे कालावधी करीता हॉल भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगीताने सभा संपल्याचे घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद